# मुंबई विद्यापीठ

डॉ. अजय प्र. देशमुख
एम.ए., पीएच.डी.
कुलसचिव

REG/ICC/2019-20/26

परिपत्रक :

**विषय- राज्यात कोरोना विषाणू (कोव्हिड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत**

संदर्भ १) सार्वजनिक आरोग्य विभाग, पत्र क्र. करोना—२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य —५, दिनांक १४/०३/२०२०

२) सार्वजनिक आरोग्य विभाग, पत्र क्र. करोना—२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य —५, दिनांक १५/०३/२०२०

३) संक्रीर्ण —२०२० प्र.क्र. ६०/२०/तांशि—१, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई, दिनांक १६/०३/२०२०

४) शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण) पुणे पत्र क्र. उशिंस/कोरोना/मवि—१/२०२०/३८१९ दिनांक १६/०३/२०२०

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी संदर्भाधिन पत्रानुसार कोरोना विषाणूचा (कोव्हिड—१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७, दि. १३/०३/२०२० पासून लागू करुन खंड—२,३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमित केलेली आहे. अधिसुचनेतील उपाययोजनेचा भाग म्हणून उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व महानगरपालिका, सर्व नगरपालिका व सर्व नगरपंचायत क्षेत्रातील सर्व सरकारी/अनुदानिक/खाजगी शैक्षणिक संस्था/महाविद्यालये/अकृषी विद्यापीठे दिनांक ३१ मार्च, २०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबत सुचना निर्गमित केल्या आहेत. तथापी विद्यापीठांनी प्रात्यक्षिके व परीक्षा विहित वेळापत्रकानुसार घेण्यात याव्यात असाही निर्णय घेण्यात आला होता. तसेच आजारी विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांच्या संपर्कात येणार नाही, यासाठी आवश्यक ती दक्षता व खबरदारी घेण्याच्या सूचना देखिल देण्यात आल्या आहेत.

उपरोक्त संदर्भाकिंत पत्र क्र. २, ३ व ४ चे अनुषंगाने तंत्र शिक्षण/उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व अकृषी विद्यापीठें/तंत्रशास्त्र विद्यापीठे/सर्व स्वयं अर्थसहाय्यित, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित/मॉडेल डिग्री महाविद्यालये/तंत्रनिकेतन/अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये/वसतिगृहे व परिसंस्था तसेच कला संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व शैक्षणिक संस्था/वसतीगृहे दिनांक ३१/०३/२०२० पर्यंत बंद राहतील.

या अनुषंगाने मुंबई विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये, विद्यापीठ उपपरिसरे, आदर्श महाविद्यालये, मान्यता प्राप्त संस्था व विद्यापीठ शैक्षणिक विभागा अंतर्गत दिनांक ३१.०३.२०२० पर्यंत होणा—या प्रात्यक्षिक व लेखी परिक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. **सदर परिक्षांचे सुधारित वेळापत्रका संदर्भात शासनाच्या निर्देशानुसार कार्यवाही करण्यात येईल.**

**महात्मा गांधी मार्ग, फोर्ट परीसर, मुंबई ४०० ०३२. दुरध्वनी : ९१-२२-६८३२ ०००७.**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, विद्यानगरी, सांताक्रुझ, मुंबई ४०० ०९८.**
ईमेल.: registrar@fort.mu.ac.in वेबसाईट.: www.mu.ac.in

Scanned with CamScanner

# मुंबई विद्यापीठ

डॉ. अजय प्र. देशमुख
एम.ए., पीएच.डी.
कुलसचिव




मुंबई विद्यापीठातील सर्व अध्यापक दिनांक २५/०३/२०२० पर्यंत घरी राहून (work from home) कामकाज करु शकतील. तथापी, आपत्कालीन परिस्थिती उद्‌भवल्यास प्रशासकीय कारणास्तव कुलगुरू / प्र कुलगुरू / कुलसचिव/संचालक/अधिष्ठाता यांनी निर्देश दिल्यास त्यानुसार अध्यापकांना विभागामध्ये / कार्यालयामध्ये तातडीने हजर राहणे बंधनकारक राहील.

विद्यापीठाच्या NAAC संदर्भात सुरु असलेल्या तातडीच्या कार्यवाहीच्या अनुषंगाने संचालक, अंतर्गत गुणवत्ता शाश्वती कक्ष (IQAC) आणि राष्ट्रीय मुल्यांकन व अधिस्विकृती परिषद (NAAC) संदर्भात विविध निकष (criteria) समन्वयक व सर्व शैक्षणिक विभागांचे संचालक/विभाग प्रमुखांनी आवश्यकतेनुसार विभागात/कार्यालयात उपस्थित राहावे.

मा. कुलगुरू / प्र कुलगुरू / कुलसचिव/अधिष्ठाता /संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ/ वित्त व लेखा अधिकारी/ संचालक, ज्ञान स्त्रोत केंद्र/इतर संवैधानिक अधिकारी/संचालक, उपपरिसरे/उपकुलसचिव व शिक्षकेत्तर कर्मचारी नियमितरित्या कार्यालयामध्ये उपस्थित राहतील.

विद्यापीठाच्या वसतिगृहांमध्ये वास्तव्यास असणारे विद्यार्थी उपरोक्त कालावधीमध्ये त्यांच्या मुळगावी जातील. या संदर्भात संबंधित वसतिगृह अधिक्षकांनी आवश्यक खबरदारी घ्यावी. प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा भाग म्हणून विद्यापीठामध्ये पूर्व परवानगी शिवाय सर्व अभ्यागंताना उपरोक्त कालावधीमध्ये प्रवेश देण्यात येणार नाही. या कालावधीमध्ये विद्यापीठ आवारातील व्यायाम शाळा, अभ्यासिका व सर्व क्रिडा सुविधा बंद राहतील. विद्यापीठ फोर्ट परिसर, कलीना परिसर व उपपरिसरांच्या प्रवेशद्वारांमधून शक्यतोवर विद्यापीठाचे अधिकारी / कर्मचारी व शिक्षकांना प्रवेश देण्यात येईल. उपरोक्त कालावधीमध्ये सर्वांनी विद्यापीठाचे ओळखपत्र सोबत बाळगावे.

वरील उपाययोजनां संदर्भात आवश्यकतेनुसार पुढील कार्यवाहीच्या सुचना वेळोवेळी निर्गमित करण्यात येतील. काही अडचणी असल्यास कृपया खालील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

१. परीक्षा विभाग ०२२– २६५३२०५२/५३/२६५३२०३५
२. प्रशासकीय विभाग ०२२– २२७०२३४८/६८३२०००६

मुंबई
१६ मार्च, २०२०

(डॉ. अजय देशमुख)
कुलसचिव

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी-**

सर्व विभागप्रमुख, संचालक, सर्व शैक्षणिक विभाग, प्र-संचालक (उप-परिसरे), समन्वयक आदर्श महाविद्यालय (आंबडवे/तळेरे), अधिक्षक, मुलांचे व मुलींचे वसतिगृह, सुरक्षा अधिकारी


महात्मा गांधी मार्ग, फोर्ट परीसर, मुंबई ४०० ०३२. दुरध्वनी : ९१-२२-६८३२ ०००७.
डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, विद्यानगरी, सांताक्रुझ, मुंबई ४०० ०९८.
ईमेल.: registrar@fort.mu.ac.in वेबसाईट.: www.mu.ac.in


Scanned with CamScanner